RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ५(२)] शुक्रवार, फेब्रुवारी ६, २०१५/माघ १७, शके १९३६ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय

मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ फेब्रुवारी २०१५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एफएसटी. ०३/१४/प्र.क्र. २२१/फ–४.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ मधील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील वनक्षेत्रपाल गट-ब (राजपत्रित) या पदाच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना वनक्षेत्रपाल गट-ब (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०१४ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " आयोग " याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(ब) " पदवी " याचा अर्थ मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी,

(क) " विभाग " याचा अर्थ शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अधिपत्याखालील वन विभाग,

(ड) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन,

(इ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा अधिनियम महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो,

(फ) " उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा अधि. महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासानाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

**३.** महाराष्ट्र वन सेवा मधील "वनक्षेत्रपाल", गट-ब या पदावरील नियुक्ती—

(अ) वनपाल हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान ३ वर्षे इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रतेच्या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

**किंवा**

(ब) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेसंदर्भात आयोगाशी वेळोवेळी याबाबतीत विचार विनिमय करून शासनाने काढलेल्या आदेशानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या " मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेच्या " निकालाच्या आधारावर तयार केलेल्या सामायिक गुणवत्ता यादीच्या आधारे, वनपाल पद धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींच्या निवडीने ;

**किंवा**

(क) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेद्वारे नामनिर्देशनाने,

**४.** मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे निवड होण्यासाठी परीक्षेला बसण्यास उमेदवारांनी पुढील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील—

(१) (अ) वन विभागात "वनपाल" म्हणून किमान ५ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेली असावी ;

(ब) उमेदवार २१ वर्षांपेक्षा कमी व ४२ वर्षांहून जास्त वयाचा नसावा ;

(क) (i) उमेदवाराने, खालीलपैकी कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण केलेली असावी :— वनस्पती शास्त्र, रसायन शास्त्र, वन शास्त्र, भू शास्त्र, गणित शास्त्र, भौतिक शास्त्र, सांख्यीकी शास्त्र, प्राणी शास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषी शास्त्र, अभियांत्रिकीमधील (कृषी/रसायन/स्थापत्य/संगणक/विद्युत/इलेक्ट्रॉनिक्स/यंत्रयांत्रिकी), संगणक ॲप्लिकेशन/संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशु वैद्यकीय विज्ञान यापैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी.

**किंवा**

(ii) विज्ञान शाखेव्यतिरिक्त अन्य शाखेतील गणित विषयासह पदवी धारक :

परंतु आणखी असे की, मर्यादित विभागीय स्पर्धात्मक परीक्षेद्वारे निवडीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध न झाल्या, सदर कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात येतील.

(२) मर्यादित विभागीय परीक्षेस बसण्याकरिता उमेदवारांना कमाल ३ संधी उपलब्ध राहतील. परंतु, मागासवर्गीय उमेदवारांना ५ संधी उपलब्ध राहतील ;

(३) उमेदवाराचे मागील पाच वर्षांपैकी तीन वर्षांच्या गोपनीय अहवालातील शेरे "उत्कृष्ट" तसेच उर्वरित दोन वर्षांचे "चांगला" या दर्जाचे असणे आवश्यक आहे ;

(४) मागासवर्गीय उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असणे आवश्यक राहील.

**५.** नामनिर्देशनाद्वारे निवडीसाठी आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या मर्यादित स्पर्धा परीक्षेस बसण्यास पात्र होण्यासाठी उमेदवारांनी खालील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील :—

(अ) २१ वर्षांपेक्षा कमी आणि ३३ वर्षांहून जास्त वयाचा नसावा ;

(१) (i) वनस्पती शास्त्र, रसायन शास्त्र, वन शास्त्र, भू शास्त्र, गणित शास्त्र, भौतिक शास्त्र सांख्यीकी शास्त्र, प्राणी शास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषी शास्त्र, अभियांत्रिकीमधील (कृषी/रसायन/स्थापत्य/संगणक/विद्युत/इलेक्ट्रॉनिक्स/यंत्रयांत्रिकी), संगणक ॲप्लिकेशन/संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशु वैद्यकीय विज्ञान यापैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी धारण केलेली असावी.

**किंवा**

(ii) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेच्या पदवीधर असलेल्या व गणित विषयासह पदवी धारण केलेल्या उमेदवार ;

मात्र हा उमेदवार विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(क) पुढील शारीरिक पात्रता पूर्ण केलेली असावी :—

| | | महिलांकरिता | पुरुषांकरिता |
|---|---|---|---|
| (१) | उंची | १५० सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावी. | १६३ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावी. |
| (२) | छाती | — ,, — | न फुगवता ७९ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावा. |
| | **अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी** | | |
| (१) | उंची | १४५ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावी. | १५२.५ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावी. |
| (२) | छाती | — ,, — | न फुगवता ७९ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सेंटीमीटर्सपेक्षा कमी नसावा. |

(ड) सुधारणेनंतर (आफ्टर करेक्शन) ४ + ० सह प्रत्येक डोळ्याची दृष्टी तीक्ष्णता (व्हीज्युअल ॲक्विटी) ६/६ असावी. बाह्य डोळ्यावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

(इ) पुरुष व महिला उमेदवारांमध्ये अनुक्रमे २५ कि.मी. व १४ कि.मी. अंतर चार तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक आहे.

**६.** " नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती पदोन्नतीने, मर्यादित विभागीय स्पर्धात्मक परिक्षेद्वारे निवडीने व नामनिर्देशनाने २५:२५:५० या प्रमाणात करण्यात येईल ;

परंतु, नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुकांच्या कोट्यातील ५ टक्के पदे " वनशास्त्र " या विषयातील पदवीधारकांमधून भरण्यात येतील.

परंतु योग्य वनशास्त्र पदवीधारक न मिळाल्यास सदर पदे नियम ५(ब) मध्ये नमूद अर्हताधारकामधून भरण्यात येतील ;

**७.** " नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशाने नियुक्त केलेल्या उमेदवाराचा परिविक्षाधीन कालावधी ३ वर्षांचा असेल. पदावर नियुक्त उमेदवाराने, केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या वनशास्त्र प्रशिक्षण महाविद्यालयातील दीड वर्ष कालावधीचे प्रशिक्षण तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक किंवा मुख्य वनसंरक्षक यांनी विहित केलेले दीड वर्षांचे क्षेत्रिय प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे तसेच विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करमे आवश्यक राहील. विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास किंवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा उमेदवार सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास, तो/ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

**८.** " नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त उमेदवारांनी त्यांचा प्रशिक्षण व परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर त्यांचा प्रशिक्षण कालावधी हा सेवा कालावधी म्हणून गणण्यात येईल.

**९.** नामनिर्देशनाने नेमणूक केलेल्या वनक्षेत्रपालांच्या नियुक्तीची परस्पर जेष्ठता आयोगाने घेतलेल्या परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे उमेदवाराने मिळवलेले गुण व प्रशिक्षण पाठ्यक्रमाच्या शेवटी घेण्यात येणाऱ्या अंतिम परीक्षेत उमेदवाराने मिळविलेले गुण एकत्रित करून निर्धारित केली जाईल.

**१०.** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त व्यक्तीने, " तो/ती पदावर नियुक्तीनंतर विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करेल. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यावर, या पदावर किमान ७ वर्षे सेवा पूर्ण करेल. विहित प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा विहित किमान ७ वर्षे कालावधीची सेवा पूर्ण न केल्यास, प्रशिक्षणावरील खर्चासाठी शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल इतक्या रकमेची प्रतिपूर्ती करेल. " याबाबतची संबंधित बंधपत्रे उमेदवारास नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहतील.

**११.** नियम ३ मध्ये नमूद पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने हिंदी व मराठी भाषा परीक्षा आधीच उत्तीर्ण केली नसल्यास किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्याला/तिला सूट मिळालेली नसल्यास, त्यासंबंधात विहित केलेल्या नियमानुसार त्याला/तिला उक्त परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

**१२.** " नियम ३ मध्ये नमूद पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**१३.** " नियम ३ मध्ये नमूद पदावर नेमणूक झालेल्या व्यक्ती, महाराष्ट्रात कोठेही बदली होण्यास पात्र राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. ल. थोरात,**

सहसचिव (वने),

महसूल व वन विभाग.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, dated the 5th February 2015.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. FST-03/14/C.R.221/F-4.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India and in supersession of the Range Forest Officer in the Maharashtra Forest Service, Group-B (Recruitment) Rules, 1997, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Range Forest Officer in the Maharashtra Forest Service, Group 'B' (Gazetted) under the Revenue and Forests Department of Government of Maharashtra, namely :—

**1.** These rules may be called the Range Forest Officer in the Maharashtra Forest Service, Group 'B' (Gazetted) (Recruitment) Rules, 2014.

**2.** In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(*b*) "Degree" means a degree of a Statutory University;

(*c*) "Department" means the Revenue & Forest Department of the Government of Maharashtra;

(*d*) "Government" means the Government of Maharashtra;

(*e*) "Higher Secondary School Certificate Examination" means the Higher Secondary School Certificate examination conducted by the Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah.XLI of 1965) and it includes any other examination declared by the Government to be equivalent thereto,

(*f*) "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate examination conducted by the Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah.XLI of 1965) and it includes any other examination declared by the Government to be equivalent thereto.

**3.** Appointment to the post of Range Forest Officer shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Forester, having minimum 3 years regular service in that post and have passed Secondary School Certificate Examination;

*OR*

(*b*) by selection of a suitable person holding the post of Forester, on the basis of common merit list prepared by the Commission on the basis of Limited Competitive Examination held by the Commission in accordance with the orders issued by Government in consultation with the Commission in that behalf, from time to time;

*OR*

(*c*) by nomination on the basis of Limited Competitive Examination to be held by the Commission.

**4.** In case of appointment by selection, in order to be eligible for admission to the Limited Competitive Examination held by the Commission the candidate shall,—

(*1*) (*a*) have completed a minimum five years of continuous regular service as Forester in the Forest Department;

(*b*) not be less than twenty-one years and not more than forty-two years of age;

(*c*) (*i*) possess Bachelor's degree in Science with at least one of the subjects of Botany, Chemistry, Forestry, Geology, Mathematics, Physics, Statistics, Zoology, Horticulture, Agriculture, Computer Application or Computer Science or degree in Engineering in the faculty of Agriculture or Chemical or Civil or Computer or Electrical or Electronic or Mechanical or Environmental Science or Veterinary Science;

*OR*

(*ii*) Possess a Bachelor's degree with mathematics other than science faculty;

Provided that, if candidates are not available for appointment by selection through Limited Competitive Examination, then the vacant posts from the selection quota, shall be filled in by promotion.

(*2*) For appearing the Limited Competitive Examination, the candidates shall have maximum three chances; however, the candidates belonging to the backward classes shall have maximum five chances.

(*3*) Out of last five years, annual confidential reports, the candidates should have three "Excellent" remarks and remaining two remarks should be "Good".

(*4*) The candidates belonging to the backward classes shall have to submit their Caste Validity Certificate to the concerned authority.

**5.** In. case of appointment by nomination, in order to be eligible for admission to the Limited Competitive Examination held by the Commission the candidate shall,—

(*a*) not be less than twenty-one years and not more than thirty-three years of age ;

(*b*) (*i*) possess a Bachelor's degree in Science with any one of the subjects of Botany, Chemistry, Forestry, Geology, Mathematics, Physics, Statistics, Zoology, Horticulture, Agriculture, Computer Application or Computer Science or degree in Engineering in the faculty of Agriculture or Chemical or Civil or Computer or Electrical or Electronic or Mechanical or Environmental Science or Veterinary Science;

*OR*

(*ii*) possesses a Bachelor's degree with Mathematics other than Science faculty;

Provided that, the candidates should have passed the Higher Secondary Certificate Examination in Science faculty.

(*c*) fulfill following physical qualifications : —

| | | *Female* | *Male* |
|---|---|---|---|
| (1) | Height | Shall not be less than 150 centimeters. | Shall not be less than 163 centimeters. |
| (2) | Chest | — | Shall not be less than 79 centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimeters. |

the candidates belonging to the Scheduled Tribe category fulfill following physical qualifications :—

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | Height | Shall not be less than 145 centimeters. | Shall not be less than 152.5 centimeters. |
| (2) | Chest | — | Shall not be less than 79 centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimeters. |

(*d*) *Eye sight*.—have visual acuity 6/6 each eye with + 4.00 D after correction. There should be no infective condition of external eye or squint and the candidate shall possess high degree of colour vision.

(*e*) male and female candidate should have physical capacity of walking 25 K.m. & 16 K.m. respectively, in 4 hours.

**6.** Appointment to the post mentioned in rule 3 shall be made by promotion, selection through Limited Competitive Examination and nomination in the ratio of 25:25:50, respectively:

Provided that, five per cent posts from nomination quota shall be filled in from amongst the candidates possessing "Forestry" degree:

Provided futher that, if candidates are not avilable from such five per cent (5 %) post from nomination quota, then those post shall be filled in from amongst the candidates possessing educational qualification mentioned in rule 5 (b);

**7.** A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall be on probation for a period of three years. Person appointed shall be required to complete successfully the prescribed training for a period of one and half year at Forest Science Training College recognized by the Government of India for this purpose and the field training prescribed by the Principal Chief Conservator of Forest or Chief Conservator of Forest for a period of one and half year. The person appointed to the said post by nomination shall also be required to pass the prescribed Departmental Examination within the probation period so also to complete the probation period satisfactorily. If he/she does not complete successfully the prescribed training within the probation period or does not pass the prescribed Departmental Examination or does not complete the probation period satisfactorily or is not found suitable for the post during probation period, he/she shall be liable to be terminated from the service.

**8.** After completing the prescribed training and probation period successfully, the training period shall be treated as service period.

**9.** The interse-seniority of the Range Forest Officer appointed by nomination shall be determined by adding the marks obtained by the candidate on the basis of merit in the Limited Competitive Examination held by the Commission and the marks obtained by the candidates in the final examination held at the training course.

**10.** A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall be required to execute a bond that, "he shall complete the prescribed training successfully and after completion of the prescribed training, he shall serve in that post for a minimum period of seven years. In case of failure for completion of the prescribed training or serving for such minimum period of Seven years, he shall reimburse the expenses expended on his training as may be determined by the Government, from time to time."

**11.** A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to pass examination in Hindi and Marathi languages according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

**12.** A person appointed to the post mentioned in rule 3 should possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information & Technology, Government of Maharashtra, from time to time.

**13.** A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to transfer anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. L. THORAT,
Joint Secretary (Forests)
Revenue and Forest Department.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.